**ASHA KULKARNI**

HON. GEN. SECRETARY
ANTI-DOWRY MOVEMENT, BOMBAY

**ANTI-DOWRY MOVEMENT, BOMBAY**
4/50, Vishnu Prasad 'B' CHS, Shahaji Raje Marg,
Freedom Fighter Mamasaheb Kulkarni Chowk,
Vile Parle (East), Mumbai - 400 057.
Tel.: 022-26836834 / Telefax : 022-26836132
Mob.: 9819373522 / 9819539193
E-mail : antidowry498a@gmail.com
Website : www.antidowrymovement.com

२० नोव्हेंबर २०२०.

मा.संपादक, वृत्त विभाग,
सविनय सादर प्रणाम,
खालील वृत्तास आपल्या वृत्तपत्रात कृपया प्रसिद्धी द्यावी ही विनंती,

आ. नम्र,
आशा कुलकर्णी
महासचिव – हुंडाविरोधी चळवळ, मुंबई.

*** राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत पुण्याच्या अनघा ठोंबरे प्रथम ***

हुंडाविरोधी चळवळ, मुंबई या सामाजिक संस्थेच्या सत्तेचाळिसाव्या वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत पुण्याच्या अनघा ठोंबरे यांच्या "आजची महिला सुरक्षा : भ्रम आणि तथ्य " या विषयावरील निबंधाला प्रथम पारितोषिक आणि जगन्नाथ परळकर ट्रॉफी जाहीर झाली आहे. दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक विभागून पुणे येथील शेखर बर्वे आणि मुंबईच्या आशा भिरंगी यांना देण्यात येईल. तिसऱ्या क्रमांकावर पुणे येथील डॉ. शुभदा गद्रे तसेच विशेष पारितोषिकासाठी औरंगाबादच्या अनंत बोरकर यांच्या निबंधाची निवड झाली आहे. या व्यतिरिक्त सात निबंधाची निवड उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्र प्राप्तीसाठी करण्यात आली स्पर्धेचे यंदा ३९ वे वर्ष होते. विषय होते (१) एकविसाव्या शतकातील हुंडा प्रथा आणि तरुणाई (२) आजची महिला सुरक्षा : भ्रम आणि तथ्य. पहिल्या विषयावर २० जिल्ह्यांतून ७७ निबंध स्पर्धेत दाखल झाले तर दुसऱ्या विषयावर १६ जिल्ह्यांतून ८८ निबंध. पहिल्या व दुसऱ्या विषयांचे परीक्षण अनुक्रमे डॉ. आसावरी भट आणि सुजाता नरसाळे यांनी केले.

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच स्पर्धा जाहीर झाली होती परंतू कोरोना महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख ३०सप्टेंबर २०२० पर्यंत वाढवण्यात आली, आणि त्यामुळे प्रतिसाद चांगला मिळाला.या वर्षी बक्षीस समारंभ करणे शक्य नसल्याने पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रे विजयी स्पर्धकांना पोस्टाने पाठवण्यात येतील असे संस्थेतर्फे कळविण्यात येत आहे.

************************************

# राज्यस्तरीय खुली निबंध लेखन स्पर्धा २०२०-२०२१
# निकाल

विषय : (१) एकविसाव्या शतकांतील हुंडा प्रथा आणि तरुणाई
(२) आजची महिला सुरक्षा : भ्रम आणि तथ्य

| क्रमांक | विजेत्यांचे नांव / ठिकाण | विषय | पारितोषिक |
|---|---|---|---|
| प्रथम | अनघा ठोंबरे, कोथरूड, पुणे | (२) | जगन्नाथ परळकर ट्रॉफी रोख रु.१५००/- तसेच प्रशस्तिपत्र आणि ग्रंथभेट |
| द्वितीय | (१) शेखर बर्वे, पुणे | (१) | रोख रु.५००/- प्रशस्तिपत्र |
| विभागून | (२) आशा भिरंगी, भांडुप, मुंबई | (२) | रोख रु.५००/- प्रशस्तिपत्र |
| तृतीय | डॉ. शुभदा गद्रे, कोथरूड, पुणे | (२) | रोख रु.५००/- प्रशस्तिपत्र |
| विशेष | अनंत बोरकर - औरंगाबाद | (१) | रोख रु.५००/- प्रशस्तिपत्र |

## सात उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रे

| | | |
|---|---|---|
| ज्योती साबिले - अकोला | (१) | प्रशस्तिपत्र |
| वीणा बाविस्कर - जळगाव | (२) | --- " --- |
| प्र. अ. पुराणिक - धुळे | (१) | --- " --- |
| सीमा देवस्थळी - अंधेरी, मुंबई | (२) | --- " --- |
| संपदा देशपांडे - पनवेल, रायगड | (१) | --- " --- |
| श्रद्धा वझे - कल्याण | (२) | --- " --- |
| आशा कुलकर्णी - औरंगाबाद | (१) | --- " --- |

पहिल्या विषयावर २० जिल्ह्यातून ७७ निबंध दाखल झाले, तर दुसऱ्या विषयावर १६ जिल्ह्यातून ८८ निबंध दाखल झाले. स्पर्धेचे परीक्षण अनुक्रमे डॉ. आसावरी भट आणि सुजाता नरसाळे यांनी केले. सध्या बक्षीस समारंभ करण्याची परिस्थिती नाही त्यामुळे रोख बक्षिसांचे धनादेश आणि प्रशस्तिपत्रे पोस्टाने पाठवण्यात येतील. सर्व विजेत्यांचे तसेच सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन व आभार !

आशा कुलकर्णी

२० नोव्हेंबर २०२०. महासचिव - हुंडाविरोधी चळवळ, मुंबई.